


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२६ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतले संत गजानन महाराज समाधीचे दर्शन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, बुलडाणा :** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथील संत श्री गजानन महाराज समाधीचे दर्शन घेतले.

यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण, आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, संत गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त निळकंठ शिवशंकर पाटील, हरिहर निळकंठ पाटील यांच्यासह आयुष मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी संत श्री गजानन महाराज संस्थानच्यावतीने महामहिम राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. यानंतर राष्ट्रपती महोदयांनी

संत श्री गजानन महाराज यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी मंदीर परिसराची माहिती घेत पाहणी केली. यानंतर राष्ट्रपती महोदयांचे राष्ट्रीय आरोग्य मेळावा मुख्य कार्यक्रमस्थळी प्रस्थान झाले.

## मनोज जरांगे यांचा सरकारला इशारा ! जून महिन्यात पुन्हा उपोषणला बसणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, जालना :** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला पुन्हा उपोषणाचा इशारा दिला आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या शासन निर्णयानंतर मराठा कुणबी प्रमाणपत्राला हवी तशी गती मिळाली नव्हती. त्यामुळे राज्य सरकारने याबाबतची कार्यपद्धत निश्चित करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. सरकारच्या या कार्यवाहीवर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. सरकारने हे आधीच करायचं होतं. इतके दिवस समाजाचा झळ का करायचा? गोरगरिबांच्या नोकऱ्यांचा प्रश्न राहतो. गोरगरिबांच्या जीवनाशी आणि भावनेशी सरकारने खरंच खेळायला नको. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठ्या मनाने जीआर काढला ना, त्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचादेखील पाठिंबा आहे. मग तुम्ही अडवणूक का करायची?, असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.



मराठवाड्याचा मराठा कुणबी आहे आणि हैदराबाद गॅझेटियरचा जीआर तुम्ही काढलाय, तर अडवणूक कशाला करायची? मला वाटलं निवडणुकीचा काळ आहे, त्यांच्याकडून झालं असेल. ७० ते ८० वर्षे आरक्षण नव्हतं. आणखी एक वर्षाने नाही मिळालं तरी काही हरकत नाही. दमाने घेऊ. पण तुम्ही कार्यपद्धतीसाठी आता सहा महिन्याने नियुक्ती करत आहात. मंत्रिमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर मराठा समाजाने कधीही न टाकलेला विश्वास आता प्रचंड टाकला आहे. कारण त्यांनी जीआर काढला की, मराठवाड्यातील मराठा १०० टक्के आरक्षणात जाणार. हा जो विश्वास टाकला आहे त्याचा गैरविश्वास विखे पाटील यांनी होऊ देऊ नये. ही आमची प्रामाणिक इच्छा आहे, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी मांडली. आता नाईलाज आहे. मला सरकार गरजेचं नाही. मला मंत्री गरजेचा नाही. मला माझा समाज गरजेचा आहे. मी ऐकायचं तोपर्यंत ऐकेन. तुम्ही नेहमी असं करत राहीले, जाणूनबुजून प्रमाणपत्र देत नाहीत. नोंदी सापडल्या असूनही कुणबी प्रमाणपत्र दिले जात नाही. का दिले जात नाहीत? सरकारपेक्षा अधिकारी मोठे झाले आहेत का? जाणूनबुजून का अडवणूक केली जाते?, असे प्रश्न मनोज जरांगे यांनी उपस्थित केले.

हे जाणूनबुडून मराठा समाजाचं पिळवणूक करण्याचं काम सुरु आहे. मराठ्यांच्या भविष्याशी खेळण्याचं काम सरकार करत आहे. या पुढच्या काळात त्यांनी असं काम करु नये. नाहीतर मला नाईलाजाने जून महिन्यात उपोषणाला बसावं लागेल. कारण जून महिलांचे शाळा, महाविद्यालयांचे प्रवेश असतात. सरकार विनाकारण वाटोळं करणार असेल तर मी ऐकणार नाही. एकाही मंत्र्याचं ऐकून सुद्धा घेणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

सगळ्या केसेस मागे घेऊ, असं सरकार म्हणालं होतं. पण अजून केसेस मागे घेतलेले नाहीत. सार्थीच्या शिष्यवृत्ती मुलांना मिळत नाहीयत. परदेशात गेलेल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी आहे. महामंडळाचे परतावे थांबले आहेत. या अडचणी तुम्हाला तातडीने करुन घ्यावे लागतील. सातारा गॅझेटियरचा जीआर कधी काढणार? आम्ही किती दिवस थांबायचं? सहा महिन्यांपासून थांबलो आहे. माझी सहनशीलता संपू देऊ नका, असा मोठा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

## खापरखेड़ा येथील महाराष्ट्र विद्यालय नागपूर जिल्ह्यात प्रथम





**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत नागपूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर व्दारा आयोजित वर्षभरात घेण्यात येणाऱ्या सर्व शालेय क्रीडा स्पर्धेत कुस्ती, ज्युदो, कराटे, वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग, खोखो, व्हॉलीबॉल रस्सीखेच, कबड्डी, मैदानी स्पर्धा अश्या विविध क्रीडा प्रकारात सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त केल्यामुळे सत्र २०१८-१९ मध्ये १७ वर्ष मुले व मुली व १९ वर्षे मुले मुलींमध्ये गुणतालिकेमध्ये नागपूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून, शालेय स्तरावर क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक योजनेअंतर्गत उपक्रमांमध्ये खापरखेडा येथील महाराष्ट्र विद्यालयाने केलेली उल्लेखनीय कामगिरीबद्दल छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सिव्हिल लाईन, नागपूर येथे जिल्हाधिकारी विपीन ईटनकर व जिल्हा क्रीडाधिकारी पल्लवी धात्रक यांचे हस्ते दोन लाख, प्रशस्तीपत्र व मेजर ध्यानचंद यांची प्रतिमा विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, क्रीडाशिक्षक धैर्यशील सुटे, पलक माहुरे, ज्ञानेश्वरी घोरमोडे कुशल आवळे, नैतिक गौरखेडे, उन्नती भोसकर, पलक थुलकर यांना विद्यालयाकरिता वितरीत करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुधीर केदार, सचिव सुहासताई केदार, संध्याताई ठाकरे, वैशालीताई केदार, विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी व गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

## शहर-जिल्ह्यातील अवैध धंद्याचा प्रश्न विधानसभेच्या पटलावर

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२५, सोलापूर :** सोलापूर शहर आयुक्त कार्यालयासह दक्षिण सोलापूर तालुका ग्रामीण भागातील कंदलगाव परिसरात पोलिसांच्या संरक्षणावर डान्सबार सुरू असल्याचा गंभीर आरोप आ. सुभाष देशमुख यांनी मंगळवार दि.२४ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सुरू असणाऱ्या प्रश्न उत्तराच्या तासात उपस्थित केला. शहर- जिल्ह्यातील अवैध कारभाराचा प्रश्न विधानसभेच्या पटलावर उमटल्याने याबाबत पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षकांच्या कारवाईकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

सत्ताधारी आ. सुभाष देशमुख यांनी सोलापूर शहरासह ग्रामीण भागात सुरू असणाऱ्या अवैध धंद्यासंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधानसभा सभागृहात प्रश्न उत्तराच्या तासात लक्षवेधी उपस्थित केल्याने सोलापूर शहर जिल्ह्यातील दोन नंबर धंद्यासह सोयीच्या पोलीस कारभाराचा मुद्दा विधानसभेच्या पटलावर उमटला आहे. शहरातील आयुक्त कार्यालय हद्दीत असणाऱ्या डान्सबारचा व्हिडिओ आपण



आयुक्त कार्यालयाला पाठवला. अधिकारी चौकशीसाठी

गेले मात्र कोणतीच कारवाई न करता परतले, याचा अर्थ पोलीस संरक्षणावर डान्सबार सुरू आहेत का? असाच प्रकार कंदलगाव हद्दीत सुरू आहेत. याबाबत कोणती कारवाई करणार? असा प्रश्न आ.सुभाष देशमुख यांनी मंगळवार दि.२४ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान सुरू असणाऱ्या प्रश्न उत्तराच्या तासात लक्ष वेधेद्वारे उपस्थित केला. पोलीस आयुक्तांकडे पाठविलेला व्हिडिओ, कारवाईसाठी पोलीस त्या डान्सबारमध्ये गेले. मात्र कारवाई न करताच परत आले. हे दोन्ही व्हिडिओ सभागृहात सादर करण्याची परवानगी आ. देशमुख यांनी विधानसभा सभागृहाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे मागितली.

**तो डान्सबार विजापूर नाका पोलीस स्टेशन हद्दीत...**

● आमदार देशमुख यांनी विधानसभेत लक्षवेधीद्वारे उपस्थित केलेल्या प्रश्नातील तो डान्सबार विजापूर नाका पोलीस स्टेशन हद्दीतील असल्याची चर्चा आहे. त्या डान्सबारला कायदेशीररित्या परवानगी आहे का? सत्ताधारी आमदाराने तक्रार केल्यानंतरही त्या डान्सबारवर पोलिसांची इतकी मर्जी का? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित केले जात आहेत.

**सत्ताधारी आमदारांच्या तक्रारीनंतरही डोळेझाक?**

● सोलापूर शहर व ग्रामीण भागात अवैधरित्या सुरू असलेल्या डान्सबारावरील कारवाईबाबत आ.सुभाष देशमुख यांनी यांनी पोलीस आयुक्त कार्यालयाकडे तो व्हिडिओ सादर केला. मात्र आमदार देशमुख यांच्या म्हणण्यानुसार पोलिसांनी त्या डान्सबारवरील कारवाईकडे दुर्लक्ष केले आहे. हा प्रकार गंभीर असून सत्ताधारी आमदाराच्या तक्रारीनंतर ही कारवाईबाबत पोलिसांची डोळे झाक होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

**सखोल चौकशी करणार : ना. भोयर**

● आ.सुभाष देशमुख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गृहराज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करू, असे आश्वासन विधानसभा सभागृहात दिले.

## विंचूरच्या सिद्धार्थ कॉलनीसह विविध उपनगरांत १९ लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, विंचूर (नाशिक) :** विंचूर (ता. निफाड) येथील प्रभाग क्रमांक ४ मधील विविध वस्त्यांच्या विकासासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यम ातून १९ लाख रुपयांच्या निधीचा मार्ग मोकळा झाला आहे. सरपंच सचिन रत्नाकर दरेकर यांच्या हस्ते नुकताच या विकासकामांचा भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. यामध्ये प्रामुख्याने सिद्धार्थ नगर, अण्णाभाऊ साठे नगर आणि रोहिदास नगर येथील प्रलंबित प्रश्नांना गती देण्यात आली आहे.



**विकासकामांचा तपशील आणि तरतूद**

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन देत, सरपंचांनी खालील कामांचे नियोजन जाहीर केले :

कामाचे स्वरूप ठिकाण अंदाजित खर्च (निधी)

भूयारी गटार बांधकाम सिद्धार्थ नगर ७ लाख रुपये

रस्ता कॉंक्रिटीकरण अण्णाभाऊ साठे नगर ७ लाख रुपये

LED स्मार्ट स्ट्रीट लाईट रोहिदास नगर ५ लाख रुपये एकूण निधी

**मान्यवरांची उपस्थिती :**

याप्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी रा.म. मगर, ग्रामपंचायत सदस्य शोभा बोराडे, मंगल खैरे, दिलीप चव्हाण यांच्यासह गावातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाला कैलास सोनवणे, विलास गोरे, ज्ञानेश्वर पवार, इमरान मोमीन, गोरख गांगुर्डे, मधुकर बा. दरेकर, बाळासाहेब निकाळे, अनिल विंचुरकर, सागर बोराडे, इस्माईल मोमीन, संतोष कांगणे, राजेंद्र नारायणे, सुनील बागले, उदय रणखांबे, पृथ्वीराज रणखांबे यांच्यासह परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## बातमीचा इम्पॅक्ट! नगर-मनमाड रस्त्यावर नियमित पाणी फवारणी; नागरिकांना दिलासा

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२५, राहुरी :** अहिल्यानगर जिल्हा येथील नगर–मनमाड महामार्गावरील धुळीच्या समस्येबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची तात्काळ दखल घेत संबंधित विभागाने राहुरी खुर्द परिसरात नियमित पाणी फवारणी सुरू केली आहे. या कारवाईमुळे काही दिवसांपासून धुळीने हैराण झालेल्या व्यापारी व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महामार्गाच्या सुरू असलेल्या दुरुस्ती व रुंदीकरणाच्या कामामुळे रस्त्यावर साचलेली सैल माती, खडी व खोदकामामुळे दिवसभर धुळीचे लोट उडत होते. जड वाहनांच्या सततच्या रहदारीमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली होती. दुकानदारांच्या दुकानात धूळ साचून माल खराब होत होता, तर ग्राहकांची ये-जा घटल्याने व्यापारावर परिणाम होत होता. अनेक नागरिकांनी श्वसनाचे त्रास, घशात खवखव, डोळ्यांची जळजळ व ॲलर्जीच्या तक्रारी



व्यक्त केल्या होत्या.

बातमी प्रसिद्ध होताच संबंधित कंत्राटदार व स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे हालचाल करत पाण्याच्या टँकरद्वारे सकाळ-संध्याकाळ नियमित शिंपडणी सुरू केली. जास्त वर्दळीच्या भागात पाणी मारण्यावर भर देण्यात येत असून काही ठिकाणी अतिरिक्त टँकरचीही व्यवस्था करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

नागरिकांनी सांगितले की, पाणी फवारणीमुळे हवेत उडणारी धूळ लक्षणीय प्रमाणात कमी झाली असून रस्त्यावरून प्रवास करताना होणारा त्रासही कमी झाला आहे. दुचाकीस्वारांना वाहन चालवताना पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित वाटत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

तथापि, ही उपाययोजना तात्पुरती असून रस्त्याचे काम जलद गतीने व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक असल्याची मागणी कायम आहे. तसेच काम पूर्ण होईपर्यंत नियमित पाणी शिंपडणी, खड्डे बुजविणे व सैल माती त्वरित हटविणे या उपाययोजना सातत्याने राबवाव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

प्रसारमाध्यमांच्या बातमीचा सकारात्मक परिणाम झाल्याचे स्पष्ट झाले असून नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडल्यास प्रशासनाकडून तत्काळ प्रतिसाद मिळू शकतो, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

# शांततेसाठी खंडणी ?



धगधगत्या गाझामध्ये शांतता नांदावी यासाठीच्या 'शांतता मंडळा'चे उद्घाटन दावोसमधील जागतिक आर्थिक परिषदेच्या परिघात करण्यात आले. त्यावेळी एक प्रारंभिक चार्टर/सनद सार्वजनिकरीत्या दाखवली गेली. या उपक्रमाला अमेरिकेने जवळपास ६० देशांना आमंत्रित केल्याचे आणि त्यापैकी अनेक देशांनी आमंत्रण स्वीकारल्याचे/प्रतिसाद दिला.

सनदेच्या मसुद्यातील एक महत्त्वाचे कलम असे आहे, की प्रत्येक देशाला पहिल्या तीन वर्षांचे सदस्यत्व मिळण्यासाठी कोणत्याही देयकाची गरज नाही; मात्र 'स्थायी सदस्यत्व' मिळविण्यासाठी प्रत्येक देशाने किमान एक अब्ज डॉलर (म्हणजे ९३०० कोटी रुपये) जमा करावेत, असे नमूद आहे. हे कलम आणि पैसे गाझाच्या पुनर्निर्माणासाठी वापरले जातील, असे अनेक आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रांनी म्हटले आहे. या मंडळात सहभागाचा निर्णय पाकिस्तानच्या परराष्ट्र खात्याने अधिकृतरीत्या जाहीर केला. तसेच सौदी अरेबिया, तुर्की, कतार, संयुक्त अरब अमिराती, इजिप्त, जॉर्डन, इंडोनेशिया यांसारख्या मुस्लिमांचे प्राबल्य असलेल्या काही देशांनी सहभागी होण्याचे संकेत दिले, किंवा त्यांनी निमंत्रण स्वीकारले. हंगेरी आणि व्हिएतनाम यांसारख्या काही देशांनीही निमंत्रण स्वीकारले. जर्मनी, फ्रान्स, स्वीडन, नॉर्वे आणि स्पेन असे अनेक युरोपीय देश आणि काही पाश्चिमात्य देशांनी सहभागास स्पष्ट नकार दिला, किंवा सावध भूमिका घेतली. त्यामुळे हा उपक्रम संपूर्णपणे सार्वत्रिक आहे, असे मानता येणार नाही. यामुळे एक वास्तव समोर आणले आहे, ते म्हणजे जागतिक राजकारण आदर्शवादाकडून वेगाने व्यवहारवादाकडे झुकत आहे.

'पैशावर आधारित संरक्षण संकल्पना' हा कोणताही अधिकृत करार नाही. गेल्या काही वर्षांत अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात दिसून आलेल्या एका बदलत्या विचारसरणीचे ते प्रतिबिंब आहे. या संकल्पनेची मुळे २०१६ नंतरच्या काळात, विशेषतः डोनाल्ड ट्रम्प यांच्या राजकीय उदयानंतर स्पष्टपणे दिसू लागली. २०१६च्या अमेरिकी अध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचारादरम्यान ट्रम्प यांनी प्रथमच नाटो आणि अमेरिकेच्या पारंपरिक मित्रदेशांवर 'मोफत संरक्षण' घेत असल्याचा आरोप केला. सन २०१७मध्ये राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी नाटो सदस्य देशांवर संरक्षण खर्च वाढवण्यासाठी थेट दबाव टाकण्यास सुरुवात केली. अमेरिकेचे संरक्षण हे कोणतेही दान नसून त्याची किंमत मोजावी लागेल, अशी भूमिका त्यांनी उघडपणे मांडली. सन २०१८ आणि २०१९ या काळात ही भूमिका अधिक आक्रमक झाली. नाटो परिषदांमध्ये ट्रम्प यांनी जर्मनी, फ्रान्स आणि इतर युरोपीय देशांवर संरक्षण खर्चासाठी जीडीपीच्या ठरावीक टक्क्यांपेक्षा कमी योगदान देत असल्याचा आरोप केला.

सन २०२०पर्यंत अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात बहुपक्षीय संस्थांऐवजी द्विपक्षीय, व्यवहाराधारित करारांवर भर देण्याची प्रवृत्ती स्पष्ट झाली. या पार्श्वभूमीवर 'सुरक्षा म्हणजे सेवा, आणि सेवेची किंमत द्यावी लागते' हा विचार हळूहळू आकार घेत गेला. सन २४-२५च्या निवडणूक प्रचारात ही संकल्पना पुन्हा चर्चेत आली. ट्रम्प किंवा त्यांच्या जवळच्या राजकीय वर्तुळातून काही वेळा असे संकेत दिले गेले, की अमेरिकेचे संरक्षण हवे असेल, तर संबंधित देशांनी त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक योगदान द्यावे.

या संकल्पनेचा मूळ उद्देश अमेरिकेचा जागतिक संरक्षणावरील खर्च कमी करणे, मित्रदेशांना आर्थिक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणे आणि आंतरराष्ट्रीय संबंध अधिक व्यवहाराधारित बनवणे हा आहे. या संदर्भात 'प्रोटेक्शन मनी' ही संकल्पना जागतिक स्तरावर अतिशय वादग्रस्त ठरली आहे. अनेक देश आणि तज्ज्ञांच्या मते ही भूमिका आंतरराष्ट्रीय संबंधांचे व्यापारीकरण करते. त्यामुळे ही संकल्पना काहींना दबावतंत्र किंवा राजकीय सौदेबाजीचा प्रकार वाटतो. महत्त्वाचा प्रश्न असा, की कुठले देश या छत्राखाली प्रत्यक्षात एकत्र आले आहेत का? तर, औपचारिकरीत्या तसे काहीही झालेले नाही. कारण मुळात ही कोणतीही संघटना नाही, तिची सनद नाही, सदस्यत्वाचे निकष नाहीत आणि कोणतीही अधिकृत घोषणा किंवा करार सध्यातरी अस्तित्वात नाही. याउलट अनेक देशांनी या विचारसरणीला उघड किंवा अप्रत्यक्ष विरोध दर्शवला आहे.

जर्मनी, फ्रान्स आणि इतर काही युरोपीय राष्ट्रांनी नाटोचे सामूहिक संरक्षणाचे तत्त्व व्यवहाराधारित करणे धोकादायक असल्याचे म्हटले आहे. त्यांचा युक्तिवाद असा आहे, की संरक्षण ही केवळ आर्थिक देवाणघेवाण नसून दीर्घकालीन विश्वास आणि सामूहिक जबाबदारीवर उभी असलेली संकल्पना आहे. विकसनशील देशांमध्येही ही भूमिका अस्वस्थता निर्माण करणारी ठरली आहे. कारण अशा व्यवस्थेत श्रीमंत देश सुरक्षित राहतील आणि गरीब देश अधिक असुरक्षित होतील, अशी भीती व्यक्त केली जाते. चीन आणि रशिया यांनी या संकल्पनेचा थेट निषेध करताना, अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिक व्यवस्थेतील विसंगती अधोरेखित केल्या आहेत. त्यांच्या मते, ही भूमिका बहुपक्षीयता दुबळी करून जगाला अधिक अस्थिर करेल.

भारताच्या दृष्टीने पाहता, भारताने या संदर्भात पारंपरिकपणे धोरणात्मक स्वायत्तता जपली आहे आणि कोणत्याही एका शक्तीवर पूर्णपणे अवलंबून राहण्याऐवजी बहुपक्षीय मंचांचा वापर केला आहे. त्यामुळे भारतासह अनेक देशांनी नाटोसदृष्य व्यवहाराधारित सुरक्षेऐवजी ब्रिक्स, शांघाय सहकार्य संघटना आणि इतर प्रादेशिक मंचांवर भर दिलेला दिसतो. परस्पर व्यापार, आर्थिक विकास बँका आणि राजकीय समन्वय हे अनेक देशांना अधिक समतोल आणि सशर्त नसलेले पर्याय वाटत आहेत. सामूहिक संरक्षणाच्या तत्त्वावरचा विश्वास जर आर्थिक सौद्यांवर अवलंबून राहिला, तर दीर्घकालीन एकजूट कमजोर होऊ शकते. त्यामुळे 'नाटो' संस्थात्मकदृष्ट्या टिकून राहील; पण त्याची एकात्म भावना आणि विश्वासार्हता कमी होण्याची शक्यता आहे.

**- राजीव शहा**

# गझल सम्राट ; पंकज उधास



आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते.

१९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले.

त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले.

या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मुलींना सबळ करण्याचा राज्य सरकारचा स्तुत्य उपक्रम !



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून राज्यशासनाने 'राष्ट्र प्रथम' अभियानाच्या अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ६७० शाळांमधील इयत्ता चौथी ते आठवीपर्यंतच्या मुलींना स्वसंरक्षणाचे विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. माजी सैनिकांच्या माध्यमातून हे विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या संकल्पनेतून हे अभियान १५ जानेवारी २०२६ पासून चालू झाले असून २० मार्च २०२६ पर्यंत हे प्रशिक्षण चालू राहील.

मुलींना केवळ शारीरिकदृष्ट्या सक्षम न करता त्यांना मानसिकदृष्ट्याही कणखर बनवण्यावर भर दिला जाणार आहे. यात तायक्वांदो कराटे, ज्युडो, क्राव मागा, बॉक्सिंग यांसारख्या 'मार्शल आर्ट्स'चा समावेश आहे. योगासने आणि प्राणायाम यांद्वारे मानसिक स्वास्थ्य सुधारण्यावरही भर दिला जाणार आहे. राज्यातील स्त्री अत्याचाराचा वाढता आलेख, महिला अपहरणामध्ये राज्याने गाठलेली उच्च पातळी या पार्श्वभूमीवर राबवण्यात येणारा हा उपक्रमात स्त्रियांच्या भविष्याच्या दृष्टीने नक्कीच हितावह असणार आहे; मात्र हा उपक्रम केवळ सोलापूर राज्यापुरता मर्यादित न ठेवता राज्यातील सर्वच सरकारी आणि खासगी शाळा महाविद्यालयांमध्ये राबवण्यात यावा अशी मागणी राज्यातील जनतेकडून कारण्यात येत आहे.

प्रत्येकाच्या हातात आलेले मोबाईल्स, त्यावर इंटरनेटचा होत असलेला मुक्त वापर, सेन्सॉरची कोणतीच बंधने नसलेल्या तसेच अश्लील आणि हिंसक दृश्यांचा भरणा असलेल्या वेब सिरीज, शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून पाहिल्या जाणाऱ्या पॉर्न वेबसाईट्स, तरुण मुला मुलींना पालकांकडून दिली जाणारी वारेमाप मोकळीक, चित्रपट, डेलीसोप यांमधून विवाहबाह्य संबंध, लिव्ह इन रिलेशनशिप, समलैंगिकता, अनैतिकता यांना दिले जाणारे प्रोत्साहन या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून आज स्त्री अत्याचारांच्या घटनांत कमालीची वाढ झाली आहे. कोणतेही क्षेत्र महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्यांच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवावा असे जवळचे नातेवाईक, पोलीस, डॉक्टर, शिक्षकसुद्धा वासनाधीन होऊ लागले आहेत. तीन वर्षाच्या बालिकेपासून ८० वर्षाच्या वृद्धासुद्धा वासनांधांच्या बळी ठरू लागल्या आहेत.

अशा प्रतिकूल परिस्थितीत स्त्रीला तिच्या शीलरक्षणासाठी सक्षम करणे गरजेचे आहे आणि त्याची सुरुवात शाळा महाविद्यालयांतूनच व्हायला हवी. आजची स्त्री व्यावहारिक जगात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहे. मात्र जेव्हा समाजातील वासनांधता तिला गिळंकृत करू पाहते तेव्हा ती निर्बल ठरताना दिसत आहे.

सुशिक्षित आणि सुज्ञ असूनही हुंडयासाठी जेव्हा तिचा छळ केला जातो तेव्हा ती शक्तिहीन झालेली दिसते. परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ नसल्याने आत्महत्येचा मार्ग स्वीकारताना दिसते. भारतभूमी ही शौर्याची भूमी आहे. आजवर या भूमीवर राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, राणी चेन्नम्मा, राणी येसूबाई यांसारख्या वीरांगना होऊन गेल्या ज्यांनी आपल्या सैन्यबळाचे नेतृत्व करून शत्रूवर तुटून पडल्या. पहलगाम हल्ल्याच्या प्रतिशोधार्थ भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदुरच्या मीडिया ब्रिफींगचे चे नेतृत्व विंग कमांडर व्योमिका सिंग आणि कर्नल सोफिया कुरेशी या दोन महिलांनी केले. या सर्वांचे आदर्श आजच्या स्त्रीपुढे असायला हवेत. सरकारच्या या नूतन उपक्रमामुळे भविष्यातील स्त्री केवळ व्यावहारिकदृष्ट्याच नव्हे तर शारीरिक आणि मानसिकदृष्ट्याही सक्षम असेल. संकटांना धैर्याने सामोरी जाणारी असेल, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी असेल; मात्र हा उपक्रम केवळ काही कालावधीपुरता मर्यादित न ठेवता शाळा महाविद्यालयांत तो कायमस्वरूपी करण्यात यावा.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# देवखेळ वेबसिरीज कायमस्वरूपी बंद करण्यात यावी



कोकणची पावन भूमी ही देव-देवतांच्या श्रद्धेने आणि लोकसंस्कृतीने नटलेली आहे. होळी (शिमगा) उत्सवात 'देवखेळ' आणि 'भोवणी' ही केवळ परंपरा नसून आमची गाढ श्रद्धा आहे. या उत्सवात संकासुराला देवाचे रूप मानून पूजले जाते.

कोकणातील 'देवखेळ' किंवा 'खेळे' ही परंपरा केवळ मनोरंजन नसून तिला समृद्ध सांस्कृतिक आणि पौराणिक अधिष्ठान आहे. जरी 'देवखेळ' या नावाचा थेट उल्लेख पुराणांमध्ये जसाच्या तसा नसला, तरी या प्रथेची मूळ तत्त्वे आणि विधी 'स्कंद पुराण' आणि 'लोकपरंपरा' यांच्या संगमातून येतात.

**देवखेळाला असलेल्या पौराणिक आणि शास्त्रीय आधारांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करता येईल:**

**१. स्कंद पुराण (सह्याद्री खंड)**

कोकण भूमीला 'परशुराम भूमी' मानले जाते. स्कंद पुराणातील 'सह्याद्री खंडात' या प्रदेशातील ग्रामदैवतांचे महत्त्व वर्णन केले आहे.

**ग्रामरक्षण संकल्पना :** पुराणांनुसार, प्रत्येक गावाला एक रक्षक असतो (ग्रामदैवत). वर्षातून एकदा हे दैवत आपल्या सीमांची पाहणी करण्यासाठी आणि भक्तांच्या भेटीसाठी बाहेर पडते, याच संकल्पनेतून 'पालखी सोहळा' आणि 'देवखेळ' उगम पावले आहेत.

**शिवाचे गण:** देवखेळात जे सोंगं किंवा पात्रे असतात, त्यांना शिवाचे गण मानले जाते. जेव्हा देव 'खेळायला' बाहेर पडतो, तेव्हा त्याच्यासोबत त्याचे गण (नंदी,भृंगी इत्यादींचे प्रतीक) नाचतात, असा आधार दिला जातो.

**शास्त्रीय आधार :** हे सांख्य दर्शनातील 'पुरुष' आणि 'प्रकृती' (शिव आणि शक्ती) यांचे मिलन दर्शवते. सृष्टीचे चक्र सुरू राहण्यासाठी या दोन शक्तींचे एकत्र येणे आवश्यक आहे, हा त्यामागील तात्विक विचार आहे.

मात्र, झी मराठी ५ वरील 'देवखेळ' या वेबसीरिजमध्ये संकासुराला 'खुनी' म्हणून दाखवून आमच्या पवित्र परंपरेचे चुकीच्या पद्धतीने सादरीकरण करण्यात आले आहे. हा प्रकार कोकणी माणसाच्या भावना दुखावणारा आणि संस्कृतीचा अपमान करणारा आहे.

आमची मागणी आहे की, १. या मालिकेचे आक्षेपार्ह चित्रीकरण तत्काळ थांबवावे. २. ही वेबसीरिज कायमस्वरूपी बंद करण्यात यावी.

आमच्या दैवतांचे विद्रुतीकरण आम्ही सहन करणार नाही. समस्त कोकणवासियांनी या विद्रुतीकरणाचा तीव्र निषेध करावा! आणि गुहागर वासियांना विनंती आहे की याबाबत कोणतेही उग्र रूप धारण न करता शांततेच्या मार्गाने आपला लढा सुरू ठेवावा अशी नमन संघटनेच्या वतीने विनंती.

या लढ्यासाठी राजकीय, सामाजिक, नमन व संकासुर प्रेमी गुहागरवासीय, यूट्यूब चॅनेल, पत्रकार, सोशल मिडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया यांनी सर्वांनी सहकार्य केले आहे. त्यांचेही मनापासून आभारी आहोत, संकासुरला व देवखेळी याना श्रद्धेने जोपासणारी लोक आहेत म्हणून ही परंपरा गुहागरात टिकून आहे, त्यांचे मनापासून आभार.

**- सुधीर टाणकर**
**(पालपेणे)**
**सामाजिक कार्यकर्ते**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## कुकडी, पिंपळगाव जोगा कालव्यातून आवर्तन सोडावे

### आमदार दाते यांची जलसंपदामंत्र्यांकडे मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी व ग्रामस्थांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी आमदार काशिनाथ दाते यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन दोन महत्त्वपूर्ण निवेदने सादर केली. कुकडी डावा कालवा तसेच पिंपळगाव जोगा डावा कालवा आवर्तन तातडीने सोडण्याबाबत त्यांनी ठोस मागणी केली.

आमदार दाते यांनी दिलेल्या पत्रानुसार, कुकडी डावा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी तसेच ओलिताखालील पीक क्षेत्र व पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता आवर्तन दि.०१ मार्च २०२६ रोजी सोडण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत मुख्य अभियंता, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे व अधिक्षक अभियंता, कुकडी सिंचन मंडळ, पुणे यांना तातडीच्या सूचना देण्याची विनंतीही करण्यात आली आहे. तसेच पिंपळगाव जोगा डावा कालवा हा मतदारसंघातील अनेक गावांसाठी शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्त्रोत असून सध्या पाणी पातळी खालावल्याने तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी आवर्तन सोडण्यात यावे, अशी मागणी दुसऱ्या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

शेतकरी हिताला प्राधान्य देत पाणी प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार दाते यांच्या या प्रयत्नांमुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. पिकांचे संरक्षण व ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची सोय सुनिश्चित करण्यासाठी आमदार दाते सरांचा हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेबांनी निवेदनाची दखल घेत संबंधित प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ आवश्यक त्या सूचना देण्याचे आश्वासन देत केलेल्या मागणीचा विचार करत कुकडी डाव्या कालव्याद्वारे १ ते ५ मार्च दरम्यान तर २५ फेब्रुवारी ते १ मार्च च्या दरम्यान पिंपळगाव जोगा डाव्या कालव्याद्वारे पाणी सोडण्यात येईल असा आश्वासन दिले.

## विसापूर येथील इसमाने गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, विसापूर (चंद्रपूर) :** येथील वॉर्ड क्रमांक एक मधील राहणाऱ्या इसमाने आजाराला कंटाळून गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. मनोज देवराव झाडे (वय ४५) असे आत्महत्या करणाऱ्याचे नाव आहे. ही घटना आज (दि.२५) रोजी उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. मनोज झाडे हा मिस्त्री काम करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. अशातच त्याला आजाराने घेरले. आजारातून मुक्त होण्यासाठी त्याने उपचार केला होता. मात्र त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. यामुळे घरात आर्थिक चणचण निर्माण झाली. यातून घरी कुटुंबात कलह वाढला. पती पत्नी मध्ये भांडण चालू झाले. यातून सुटका करण्यासाठी आईला सांगून नवीन खोलीच्या ठिकाणी गेला. तेथील खिळ्याला दोर बांधून गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. अशातच पत्नीने खोलीत डोकावले, असता तो गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याने एकच हंबरडा फोडला. या घटनेची माहिती विसापूर पोलीस चौकीला दिली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बल्लारपूर येथे ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. या घटनेचा पुढील तपास बल्लारपूरचे पोलीस निरीक्षक विपीन इंगळे यांच्या मार्गदर्शनात करत आहे.

## भानेगाव ग्रामपंचायतीकडून दिव्यांगांना मदतीचा हात

### सामान्य फंड ५% निधीतून १.५० लाखांचे वाटप



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२५, नागपूर :** भानेगाव ग्रामपंचायतीच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत सामान्य फंडातून राखीव असलेल्या ५% दिव्यांग निधीचे वाटप नुकतेच करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सरपंच शालिनी चवरे यांच्या हस्ते गावातील ५० दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ३ हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना छोटा का होईना पण हक्काचा आधार मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे. ग्रामपंचायतीचा निधी हा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला पाहिजे विशेषतः दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमचे प्रशासन सदैव तत्पर आहे असे प्रतिपादन सरपंच शालिनी चवरे यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाला ग्रामपंचायतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी व सदस्यांची उपस्थिती होती. यात प्रामुख्याने उपसरपंच सोनू बोरकर, ग्रामपंचायत अधिकारी विजय लंगडे, ग्रामपंचायत सदस्य कमलेश भास्कर, धीरज नगरकर, अरविंद तांडेकर, भूषण गौरकर, रवी चिखले, नितीन चव्हाण, अश्विनी अभ्यंकर, मीना ऊके, मंगला पांडे, दर्शना बोरकर, सीमा चिकनकर, सरस्वती तांडेकर, पुष्पा जालंदर, सोनाली बागडे आदींची उपस्थिती होती. ग्रामपंचायत अधिकारी विजय लंगडे यांनी या निधी वाटपासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता व नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

## अहिल्यानगर जिल्ह्यात ७५७ ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून सरपंचांची वर्णी

### ग्रामविकास विभागाने सोडवला तिढा ॥ झेडपी सीईओंना नियुक्ती आदेशाचे अधिकार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** नगर जिल्ह्यातील १ हजार ३२७ ग्रामपंचायतींपैकी निम्म्याहून अधिक म्हणजे ७५७ ग्रामपंचायतींचा कारभार त्रिशंकू अवस्थेत गेला होता. या ७५७ ग्रामपंचायतींवर लोकनियुक्त मंडळ (सरपंच व सदस्य) आणि प्रशासकही नव्हते. यामुळे गावगाड्यांचा कारभार चालणार कसा, असा प्रश्न असतांना आणि प्रशासक नियुक्तीचे प्रकरण न्यायालयात असल्याने तिढा निर्माण झाला होता. मात्र, ग्रामविकास विभागाने यावर मार्ग काढत मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर पुढील सहा महिने विद्यमान सरपंच यांची नियुक्ती करण्याचे राजपत्र प्रसिध्द केले आहे. यामुळे जिल्ह्यातील ७५७ ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे.

मात्र, याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे प्रत्येक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काढण्याच्या सुचना ग्रामविकास विभागाने दिल्या आहेत. राज्यातील काही जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणुका आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याने न्यायालयीन खटल्यातून प्रलंबित आहेत. त्याच्याच परिणामातून ग्रामपंचायतींच्या निवडणुका ही लांबणीवर टाकल्या गेल्या आहेत. त्याचबरोबर दुसरीकडे उच्च न्यायालयाने शासकीय




अधिकारी प्रशासक नियुक्तीस स्थगिती दिल्याने नगरसह अनेक जिल्ह्यात त्रिशंकू अवस्था निर्माण झाली होती. यातून ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कारभार याबरोबरच प्रशासकीय अडचणी ही उभ्या राहिल्या होत्या. राज्यात अशा प्रकारे मुदत संपलेल्या १४ हजारांवर ग्रामपंचायती आहेत. नगर जिल्ह्यात त्यांची संख्या ७५७ होती.

जिल्ह्यात ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी मुदत संपलेल्या ११६ ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्यात आले. मात्र, जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ अखेर मुदत संपणाऱ्या ७६१ पैकी ७५७ ग्राम पंचायतींवर प्रशासक नियुक्तीचे आदेश राज्य सरकारने २३ जानेवारीला काढले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी १० फेब्रुवारीला प्रशासक नियुक्तीचे आदेश दिले. या प्रशासकांनी सूत्रे स्वीकारण्यापूर्वीच उच्च न्यायालयाने प्रशासक नियुक्तीस स्थगिती दिली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ७५७ ग्रामपंचायतींवर सध्या प्रशासकही नव्हते. त्यामुळे शासकीय कामकाजात तिढा निर्माण होण्याची स्थिती होती. त्यावर मात करण्यासाठी राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाने २० तारखेला राजपत्र प्रसिद्ध केले आहे.

त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंच यांना सहा महिने किंवा ग्रामपंचायत स्थापनेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत यापैकी आधी असेल त्या कालावधीसाठी प्रशासक म्हणून नियुक्त करता येणार आहे. यामुळे मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तींचा मार्ग मोकळा झाला आहे.

**एकूण ७५७ ग्रामपंचायती**

अकोले ५१, संगमनेर ९४, श्रीरामपूर २७, कोपरगाव २९, राहाता २५, राहुरी ४४, नेवासा ५९,पारनेर ८७, शेवगाव ४८, पाथर्डी ७७, जामखेड ४९, श्रीगोंदा ५७, कर्जत ५४ व अहिल्यानगर ५७ अशा या एकूण ७५७ ग्रामपंचायती आहेत.

## माथेरानमध्ये रिक्षा संपाचा चौथा दिवस; १५ दिवसांत निर्णयाचे प्रशासनाचे आश्वासन

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२५, माथेरान :** माथेरानमध्ये सुरू असलेल्या इ रिक्षा संपाचा आज चौथा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर इ रिक्षा संघटनेच्या शिष्टमंडळाची तहसील कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीस तहसीलदार सुरेंद्र सिंग ठाकूर, मुख्याधिकारी राहुल इंगळे उपस्थित होते.

बैठकीदरम्यान शासनाची भूमिका संघटनेसमोर स्पष्ट करण्यात आली. सर्व रिक्षा धारकांना न्याय देण्याबाबत शासन सकारात्मक असून, रिक्षा परवानग्या व संबंधित प्रक्रियेबाबत लवकर निर्णय घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तहसील कार्यालयाच्या वतीने इ रिक्षा संघटनेला संप मागे घेण्याचे आवाहन



करण्यात आले. तसेच येत्या १५ ते २० दिवसांचा अवधी देण्याची विनंती करण्यात आली. या कालावधीत संबंधित मॉनिटरिंग कमिटीची बैठक तातडीने आयोजित केली जाईल आणि त्या बैठकीत रिक्षाधारकांच्या प्रश्नांवर सकारात्मक व ठोस निर्णय दिला जाईल, असे आश्वासन देण्यात आले. दरम्यान, निधी उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने रिक्षा देण्याचा मुद्दा ही चर्चेत आल्याची माहिती आहे.

या आश्वासनानंतर आता रिक्षा संघटना कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आज संध्याकाळपर्यंत संघटनेचा अधिकृत निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे. शासनाच्या विनंतीला मान देत संघटना संप मागे घेईल का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, नागरिकांनाही रिक्षा सेवा सुरळीत सुरू होण्याची अपेक्षा आहे. गेले तीन दिवस रिक्षा संपामुळे नागरिक पर्यटकांचे प्रचंड झाले सोशल मीडियावर तर्क वितर्क ने माथेरानवर वेगळेच वळण लागले होते पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या माथेरानमध्ये रिक्षा सेवा बंद असल्याने स्थानिक नागरिक तसेच पर्यटकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. कदाचित शासनाच्या आश्वासनाला सकारात्मक प्रतिसाद देत रिक्षा संघटना उद्यापासून रिक्षा सेवा पूर्ववत सुरू करण्याचा निर्णय घेईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. आता अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माथेरान तहसील कार्यालय येथे इ रिक्षा संघटनाची मीटिंग झाली. या मीटिंगमध्ये सकारात्मक चर्चा झाली. आज रात्री इ रिक्षा संघटनेची मीटिंग असून यामध्ये शासनाकडून दिलेल्या सूचना दिलेल्या चर्चा बाबत सविस्तर चर्चा करून माथेरान गावाच्या हितासाठी आम्ही योग्य तो निर्णय घेऊ

**– शकील पटेल (अध्यक्ष, इ रिक्षा संघटना माथेरान)**

## देवखेळ वेबसिरीजचा देवखेळ्यांनी आरज लावून केला निषेध

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२५, गुहागर (रत्नागिरी) :** झी ५ ओटीटिवर अलीकडे प्रसारित झालेली देवखेळ वेबसिरीज मधून कोकणवासियांचे प्रामुख्याने गुहागर जनतेचे श्रद्धास्थान संकासूर दैवताला क्रूर,खुनी असल्याचे अवमानकारक चित्रण प्रसारित झाल्याने येथील जनभावना तीव्र दुखावल्या गेल्या आहेत. गेले महिनाभर देवखेळ वेबसिरीचा तीव्र निषेध नोंदवला जात असून सदर वेबसिजरीज तात्काळ बंद करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

नमन लोककला संस्था संलग्न गुहागर तालुका शाखेच्या वतीने सदर गंभीर बाब लक्षात घेऊन स्थानिक प्रशासन, लोकप्रतिनिधी तसेच राज्य सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याकडे निवेदन द्वारे सदर वेबसिरीज बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर संविधानिक म ार्गाने संपूर्ण गुहागर तालुक्यातदेवखेळ वेबसिरीजच्या निषेधार्थ मोठ्या प्रमाणात बॅनर लावून निषेध नोंदवला जात आहे.

निषेधाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून नुकतेच गावभोवनीसाठी बाहेर पडणारे तालुक्यातील देवखेळ्यांनी आपापल्या ग्रामदेवतांच्या मंदिरातून देवखेळ वेबसिरीज बंद होण्याबाबत आरज लावून आणि निषेध नोंदवून गावभोवनीसाठी चतु:सीमे बाहेर पडले आहेत. त्यामुळे गुहागर तालुक्यात ऐन शिमगोत्सवावर निषेधाचे सावट पसरल्याचे वातावरण आहे. याबाबत



नमन लोककला संस्था संलग्न गुहागर तालुका शाखेच्या वतीने शिमगो उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला सहकार्य करण्याची भूमिका घेत सर्व नमन मंडळ, देवखेळ्यांना शांततेचे आवाहन करत सामाजिक सलोखा राखण्यावर भर दिला जात असून न.लो.संस्था गुहागर तालुका शाखेचे पदाधिकारी जगन्नाथ शिंदे, सुधीर टाणकर, अनिल रांजाणे संदीप कानसे, सुधाकर मास्कर, प्रमोद घुमे, शांताराम शिंदे, उदय दणदणे, दिपक वेलुंडे, अमित काताळे, प्रशांत भेकरे, संजय कळंबाटे आदी पदाधिकारी सदस्य विशेष मेहनत घेत आहेत.

## गर्भाशय मुखाच्या कर्करोगावरील HPV लस १४ वर्षाखालील मुलींना मोफत द्यावी या मागणीला यश

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२५, धाराशिव :** महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत केंद्र सरकारने देशभरातील १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही (Human Papillomavirus) लसीकरण कार्यक्रमास मंजुरी दिली आहे.

हा निर्णय खा.ओम राजे निंबाळकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे फलित मानल जात आहे. दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजीच्या लोकसभेच्या कामकाजात अनुक्रमांक १५५ अंतर्गत विधेयक क्र. १९२/२०२५ म्हणून खासदार निंबाळकर यांनी खाजगी विधेयक सादर केले होते. या विधेयकाद्वारे देशातील १४ वर्षाखालीलमुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे.

यासाठी एचपीव्ही लस राष्ट्रीय स्तरावर मोफत उपलब्ध करून देण्याची ठोस मागणी करण्यात आली होती.गर्भाशय मुखाचा कर्करोग हा भारतातील म



हिलांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख कर्करोगांपैकी एक आहे. एचपीव्ही विषाणूमुळे होणाऱ्या या आजारावर प्रभावी प्रतिबंधक उपाय म्हणून लसीकरणाला जागतिक स्तरावर मान्यता आहे. संसदेत मांडलेल्या या विषयाकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष देत अखेर देशव्यापी मोफत लसीकरण कार्यक्रम जाहीर केला आहे.

**कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये**

* देशभरातील १४ वर्षांच्या सर्व मुलींना मोफत एचपीव्ही लस

* सरकारी रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, सम ुदाय आरोग्य केंद्रे व आयुष्मान आरोग्य मंदिरांमार्फत अंमलबजावणी गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी दीर्घकालीन संरक्षण

* या निर्णयाचे स्वागत करत खासदार ओम राजे निंबाळकर म्हणाले, १९ डिसेंबर २०२५ रोजी लोकसभेत मांडलेल्या विधेयक क्र. १९२/२०२५ च्या माध्यमातून मी देशातील मुलींच्या आरोग्य सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला होता.

केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल मी पंतप्रधान व केंद्रीय आरोग्यमंत्री यांचेआभार मानतो.या निर्णयामुळेदेशातीलग्रामीण व शहरी भागातील १ कोटी २५ लाख मुलींना प्रतीवर्ष मोफत आणि सुरक्षित आरोग्य संरक्षण उपलब्ध होणार असून, महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे.

# लासलगावमध्ये कांदा दरात मोठी घसरण; शेतकऱ्यांचा संताप !

## व्यापाऱ्यांचे संगनमत की सरकारी धोरणांचा फटका? बाजार समितीत तणावाचे वातावरण

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, लासलगाव (नाशिक) :** आशिया खंडातील कांद्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत बुधवारी (दि. २५) कांद्याच्या दरात अचानक मोठी घसरण झाल्याने शेतकरी आक्रमक झाले. दोन दिवसांपूर्वी १२०० ते १३०० रुपये प्रति क्विंटल असलेला दर थेट ३०० ते ७०० रुपयांपर्यंत खाली आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडून आंदोलन केले. विशेष म्हणजे, आंदोलनानंतर व्यापाऱ्यांशी चर्चा होताच दरात पुन्हा काहीशी वाढ झाल्याने ही घसरण 'नैसर्गिक की नियोजित?' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**आंदोलन आणि दरांचा खेळ !**

गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव सातत्याने कोसळत आहेत. आज सकाळी लिलाव सुरू होताच सरासरी दरात मोठी कपात झाल्याचे पाहून शेतकऱ्यांचा संयम सुटला. प्रहार जनशक्ती पक्षाचे गणेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी व्यवहार ठप्प केले. निंबाळकर यांनी आरोप केला की, जेव्हा भाव वाढतात तेव्हा केंद्र सरकार हस्तक्षेप करते, पण शेतकरी अडचणीत असताना मदतीला कोणीही येत नाही. किमान ३ हजार रुपये हमीभाव मिळालाच पाहिजे.

**मागणी आणि तांत्रिक कारणे...**

बाजार समितीचे सभापती डी.के. जगताप यांनी परिस्थिती स्पष्ट करताना सांगितले की, सलग सुट्ट्या आणि उत्तर भारतातील होळीच्या सणामुळे मागणीत घट झाली आहे. मात्र, व्यापाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी खरेदी दरात सुधारणा केली असून लिलाव पुन्हा सुरळीत झाले आहेत. या प्रश्नी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या मते, केंद्र सरकारने देशांतर्गत महागाई रोखण्यासाठी लादलेले निर्यात निर्बंध आणि साठवणुकीवरील मर्यादा यामुळे बाजारात कांदा साचला आहे. त्यातच आंदोलन होताच व्यापाऱ्यांनी दर वाढवल्यामुळे, व्यापाऱ्यांनी संगनमताने दर पाडले होते का? असा संशय व्यक्त केला जात आहे. सध्या ५०० ते ८०० रुपये दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नसल्याने ग्रामीण भागात तीव्र संताप व्यक्त होत आहे.



**: शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या :**

- कांद्याला किमान ३००० रुपये प्रति क्विंटल हमीभाव द्यावा.
- भावांतर योजना लागू करून २००० रुपयांचे तुटीचे अनुदान द्यावे.
- जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी निर्यातीला २५ टक्के अनुदान मिळावे.
- निर्यात शुल्काबाबत केंद्राने धोरण शिथिल करावे.
- केंद्र सरकारचे धोरण की व्यापाऱ्यांची खेळी?

# कुंडलवाडीत खाजगी ले-आउट मध्ये शहरासाठी आलेल्या विकास निधीचा गैरवापर

## दोषींवर कारवाई करण्याची डॉ.विठ्ठलराव कुडमुलवार यांची पत्रकार परिषदेत मागणी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२५, कुंडलवाडी (नांदेड) :** शहरात प्रशासक राजवटीत भाजप कार्यकर्त्यांच्या खाजगी ले-आउट मध्ये विकास निधींचा मोठा गैरवापर झाला असून याबाबत चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याबरोबरच विकास निधीची वसुलीही करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) पक्षाचे माजी उपनगराध्यक्ष डॉ.विठ्ठलराव कुडमुलवार यांनी दि.२२ फेब्रुवारी रोजी शहरातील कै. गोपीनाथराव मुंडे चौक येथे पत्रकार परिषदेत केली आहे.

कुंडलवाडी नगर परिषदेची निवडणूक पार पडण्यापूर्वी गत तीन वर्ष प्रशासक राजवट होती. या प्रशासक राजवटीत मार्च २०२५ मध्ये गट क्रमांक ३३८ -याकावार अँड उत्तरवार ले-आउट व गट क्रमांक २४९ राजेश्वर उत्तरवार ले-आउट या खाजगी ले-आउट मध्ये सी सी रोड व आरसीसी नाल्यांसाठी सुमारे २ कोटी २९ लाख ४६० रुपयांची तरतूद करण्यात आली



आहे. ही तरतूद नगरपरिषद कुंडलवाडी या नावाने दाखवण्यात आली आहे. यापैकी अनेक कामे या खाजगी ले-आउट मध्ये सध्या सुरू आहेत.

खाजगी ले-आउट मध्ये पायाभूत सुविधा देण्याची जबाबदारी ही खाजगी ले-आउट विकासकाची असताना सुद्धा गट क्र. ३३८ व गट क्र. २४९ या ठिकाणी लोक वस्ती नसतानाही सार्वजनिक निधीतून कोट्यावधीचा खर्च करणे हे महाराष्ट्र रीजनल अँड टाऊन प्लॅनिंग ऍक्ट १९६६ व युडीसीपीआर नियमांचे उल्लंघन आहे.

शहरासाठी आलेला विकास निधी खाजगी ले-आउट धारकांच्या फायद्यासाठी त्यांच्या खाजगी ले-आउट मध्ये वापर करण्यात आल्याने या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करण्यात यावी व या प्रकरणात जबाबदार असणाऱ्या प्रशासक, मुख्याधिकारी गट क्रमांक ३३८ -याकावार अँड उत्तरवार ले-आउट व गट क्रमांक २४९ राजेश्वर उत्तरवार ले-आउट या विकासकांवर फौजदारी कारवाई करण्याबरोबरच विकास निधीची वसुली ही करण्यात यावी अन्यथा याबाबत न्यायालयीन लढाईही आगामी काळात लढणार असल्याची माहिती माजी उपनगराध्यक्ष डॉ.विठ्ठलराव कुडमुलवार यांनी पत्रकार परिषद मध्ये दिली. पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष गंगाधर मरकंटे, नगरसेविका प्रतिनिधी विलास मोमयावार, माजी नगरसेवक बाशिद शेख यांच्यासह शहरातील पत्रकार, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपमहापौर देवकर यांच्या तत्परतेमुळे भुईकोट किल्ल्यातील आग आटोक्यात

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२५, सोलापूर :** सायंकाळी सुमारे सातच्या दरम्यान शहराच्या मध्यभागी असलेल्या ऐतिहासिक भुईकोट किल्ला परिसरातील खंदक बागेत अचानक आग लागल्याची घटना घडली. आगीचे प्रचंड गोळे बाहेर दिसत असल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

या घटनेची माहिती एका सजग नागरिकाने तात्काळ सोलापूरच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर यांना दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी विलंब न लावता अग्निशामक अधिकारी साळुंके यांच्याशी संपर्क साधत अग्निशामक दलाची गाडी त्वरित घटनास्थळी रवाना केली. अग्निशामक दलाच्या तत्पर कार्यवाहीमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले.

घटनास्थळी उपमहापौर देवकर यांनी स्वतः भेट देऊन पाहणी केली व संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक उपाययोजनांच्या सूचना दिल्या. पुरातत्व विभाग, महापालिका, पोलीस प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून भुईकोट किल्ला व बागेच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र बैठक घेऊन ठोस उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या आगीत काही प्रमाणात वृक्षांना फटका बसला असला तरी मोठी हानी टळली आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत चौकशी सुरू आहे. काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही तरुण किल्ल्याच्या पळवाटेतून आत प्रवेश करून अंमली पदार्थांचे सेवन करतात, त्यामुळे आग लागली असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.



या प्रसंगी सुरक्षा कर्मचारी, पुरातत्व विभागाचे अधिकारी, महापालिका कर्मचारी, महानगरपालिका अग्निशामक दलाचे जवान तसेच उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर उपस्थित होते. उपमहापौर देवकर यांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# हणमंत जगदाळे सभागृह नेते; लोकमान्य नगरच्या विकासाला नवी गती

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२५, ठाणे :** ठाणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ६-ड चे नगरसेवक हणमंत जगदाळे यांची महापालिकेच्या सभागृह नेतेपदी निवड झाल्याने लोकमान्य नगर–शास्त्रीनगर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या निवडीमुळे परिसराच्या विकसनशील वाटचालीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

जवळपास गेली तीन दशके लोकमान्य नगर–शास्त्रीनगर विभागाचे प्रतिनिधित्व करताना जगदाळे यांनी स्थानिक प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला आहे. जेष्ठ अनुभव संपन्न नगरसेवक, तसेच विरोधी पक्षनेते म्हणून काम करताना त्यांनी प्रशासनाशी समन्वय साधत विविध विकासकामांना गती दिली. रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था, सार्वजनिक आरोग्य सुविधा,वाहतूक कोंडी आणि नागरी मूलभूत सोयीसुविधांबाबत त्यांनी सातत्याने आवाज उठवला.

मूळ काँग्रेस विचारसरणीचे असलेले जगदाळे यांनी शिवसेना फुटीनंतर ना. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. त्यावेळी लोकमान्य, शास्त्रीनगरातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचा आणि विशेषतः क्लस्टर पुनर्विकास योजनेला गती व मुर्त स्वरूप देण्याचा आपला मानस त्यांनी जाहीरपणे व्यक्त केला होता. सभागृह नेतेपद हे राजकीय आणि प्रशासकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पद असल्याने त्याच्या माध्यमातून आता त्यांना धोरणात्मक पातळीवर अधिक प्रभावीपणे पाठपुरावा करण्याची संधी मिळाली आहे.अत्यंत दाटीवाटी व झोपडपट्टी क्षेत्र असलेल्या



लोकमान्य नगरातील क्लस्टर योजनेबाबत नागरिकांमध्ये मोठ्या अपेक्षा आहेत. जुन्या व धोकादायक इमारती व चाळींच्या पुनर्विकासासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार असून, त्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया आणि निधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सभागृह नेता म्हणून जगदाळे यांच्याकडे अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रलंबित प्रस्ताव आणि विकास आराखड्यांवर प्रभावी भूमिका बजावण्याची संधी आहे.

निवडीनंतर बोलताना जगदाळे यांनी ठाणे शहराबरोबरच लोकमान्य नगर–शास्त्रीनगरच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. क्लस्टर योजनेसह पायाभूत सुविधांच्या उन्नतीसाठी विशेष प्रयत्न करणार आहे, असे सांगितल्याचे समजते. त्यांच्या या भूमिकेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये आशावाद निर्माण झाला आहे.

सभागृह नेतेपदी त्यांची झालेली निवड ही त्यांचे वैयक्तिक राजकीय यशाबरोबरच लोकमान्य नगरच्या शाश्वत विकासाला बळ देणारी ठरेल, असा विश्वास परिसरातील ज्येष्ठ नागरिक व कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली लोकमान्य नगरचा विकास वेगाने होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# थोडक्यात

## जावयाने काढला सासऱ्याचा काटा !

### जावई मित्रासह जेरबंद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील शिवारातील डोंगर परिसरात आढळून आलेल्या खुनाच्या घटनेचा छडा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या तीन दिवसांत लावला असून सासऱ्याचा गळा आवळून खून करणाऱ्या जावयाला त्याच्या मित्रासह अटक करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास ढवळपुरी शिवारातील डोंगरात रामदास निवृत्ती सोनवणे (वय ५५, रा. निमगाव सावा, ता.जुन्नर, जि.पुणे) यांचा मृतदेह आढळून आला होता. अज्ञात व्यक्तीने गळा आवळून खून केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी तुळशीराम निवृत्ती सोनवणे (वय ५८, रा.सुलतानपूर, ता.जुन्नर, जि.पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ तपासाचे आदेश दिले. त्यानुसार पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले.

तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, मृताचे जावई अमित नारायण डुकरे (वय ३४, रा.पारगाव तर्फे आळे, ता.जुन्नर, जि.पुणे) आणि त्याचा मित्र अमोल उत्तम डुकरे (वय ३१, ऑ. औरंगपूर, ता.जुन्नर, जि.पुणे) यांनी हा खून केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी पारनेर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे, ही कारवाई पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

**वारंवार वाद !**

"पत्नी गेल्या वर्षभरापासून नांदत नसल्याच्या कारणावरून सासऱ्यासोबत वारंवार वाद होत होते. तसेच मुलीला मारण्याची धमकी दिल्याचा राग मनात धरून आरोपी अमित डुकरे याने मित्राच्या मदतीने सासऱ्याला कारमधून ढवळपुरी शिवारात नेऊ न गळा आवळून खून केला व मृतदेह डोंगरात फेकून दिल्याची माहिती तपासात उघड झाली.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठातील फळपिके संशोधन प्रकल्प उत्कृष्ट केंद्र पुरस्काराने सन्मानित




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२४, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठ, दि.२४ फेब्रुवारी, २०२६ अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाची १३ वी वार्षिक गटचर्चा (वार्षिक आढावा बैठक) गोविंद बल्लभ कृषि व तंत्रज्ञान विद्यापीठ, पंतनगर, उत्तराखंड येथे नुकतीच संपन्न झाली. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील उद्यानविद्या विभागांतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पास द्वितीय क्रमांकाचे उत्कृष्ट केंद्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या नेतृत्वाखाली तसेच उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ.बी.टी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या फळपिके संशोधन केंद्राने शेतकर्यांसाठी मोठे योगदान दिले आहे.

अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी तथा उद्यानविद्यावेत्ता डॉ. सुमती दिघे, कनिष्ठ रोग शास्त्रज्ञ प्रा.मधुकर शेटे, कनिष्ठ किटकशास्त्रज्ञ डॉ. रणजित कडू व सहाय्यक प्राध्यापक (उद्यानविद्या) डॉ. राहुल कडू यांनी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील सहाय्यक महासंचालक (बागायती फळे व मसाला पिके) डॉ. व्ही.बी. पटेल यांच्या हस्ते सदरचा पुरस्कार स्विकारला. उत्तराखंड मधील पंतनगर येथील कृषि विद्यापीठात संपन्न झालेल्या या बैठकीप्रसंगी पंतनगर कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एम.एस. चौहान, अ.भा.स. फळपिके संशोधन प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. प्रकाश पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. या वार्षिक बैठकीसाठी देशभरात सुमारे ३०० हून अधिक शास्त्रज्ञ उपस्थित होते.

या संशोधन प्रकल्पाने स्थापनेपासून आजतागायत फळपिकांसंदर्भात ७० हून अधिक महत्त्वपूर्ण शिफारशी प्रसारित केल्या असून लिंबूवर्गीय पिकांचे ०४ सुधारित वाण विकसित केले आहेत. यामध्ये लिंबाचे साई सरबती, फुले सरबती हे वाण शेतकर्यांमध्ये लोकप्रिय आहेत. मोसंबीचे फुले मोसंबी व फुले रसिका (सिलेक्शन-७) या वाणांचा यामध्ये समावेश आहे. फुले मोसंबी या वाणाची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे या वाणाची ७२.९५ किलो प्रति झाड व २०.१२ टन प्रति हेक्टर एवढी उत्पादन क्षमता असून तो रोग व किडीस जादा सहनशील आहे.

रसाकरीता प्रसारीत केलेल्या फुले रसिका या वाणाची उत्पादन क्षमता १६.१५ टन प्रति हेक्टर तसेच फळांची संख्या प्रति झाड ३१३ असून जीवनसत्व क ५३.१० मिली ग्रॅम प्रति १०० मिली रस एवढी आहे. महाराष्ट्राचे ६५ टक्के लिंबू लागवडीखालील क्षेत्र हे साई सरबती व फुले सरबती या वाणांखाली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेला अनुक्रमे रु. ९३५ व रु. १०२.८५ कोटी एवढा ढोबळ व निव्वळ आर्थिक फायदा मिळाला आहे. मोसंबी वाणांमुळे अर्थव्यवस्थेत रु. ६१४३.८५ कोटी ढोबळ आणि रु. ४६८.६१ कोटी निव्वळ उत्पन्नाची भर पडली आहे. या संशोधन केंद्राद्वारे विविध संशोधनात्मक लेख प्रकाशित करण्यात आले आहेत.

अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पाच्या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर या प्रकल्पास उत्कृष्ट संशोधन केंद्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याबद्दल कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सात्ताप्पा खरबडे यांनी फळपिके संशोधन प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे योगदानाबददल अभिनंदन केले आहे.